Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 544 – 548
DOI: 10.5281/zenodo.10137515

Original Research Article

# राष्ट्रपिता म. गांधी : राष्ट्र निर्माणातील भूमिका

प्रा. डॉ. सोनवणे जी. एन.

संरक्षणशास्त्र विभाग, श्री.पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय, सिरसाळा ता. परळी (वै), जि. बीड. ४३११२८ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: gnsonawane7@gmail.com

Received: 14 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

## प्रस्तावना

म.गांधी हे आज जागतिक स्तरावरील आदर्श व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जातात. त्यांच्या शांतता, सत्य, अहिंसा या मार्गावर जग मार्गक्रमण करीत आहे. भारताच्या दृष्टीने ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. त्यांच्या विचारधारेमध्ये केवळ राष्ट्र आणि राष्ट्र निर्माणाचाच संदेश मिळतो. आदर्श राष्ट्र, आदर्श समाज निर्माण करण्यासाठी ग्राम राज्याची कल्पना सांगितलेली सर्वश्रुत आहे. ग्रामव्यवस्था उत्तमप्रकारे ठेऊन स्वयंपूर्ण अर्थव्यवस्था प्रत्येक खेड्यात निर्माण झाली तरच संपूर्ण समाज आदर्श समाज होऊ शकेल, अशी त्यांची धारणा होती. महात्मा गांधीजी आदर्श समाजाच्या क्लपनेला रामराज्य म्हणून संबोधले. त्यालाच 'ग्रामराज्य', 'आदर्श राज्य' असेही म्हणतात. त्यांच्या ग्रामराज्याच्या विचारांचा केंद्रबिंदू खेडे हा होता. महात्मा गांधीजींनी रामराज्यात राज्यविहीन आदर्श समाज अपेक्षित होता. देशातील प्रत्येक गाव स्वावलंबी राहील, सहकार्य हा त्यांचा आधार असेल, लोक शांतीपूर्ण गौरवशाली जीवन व्यतीत करतील असा ग्राम गांधींना उभा करायचा होता आणि तो ग्राम हा स्वयंपूर्ण असला पाहिजे असे गांधीजींचे मत होते. अशा ग्रामातूनच गौरवशाली भारत उभा करण्याचे गांधीजींचे स्वप्न होते. अशाप्रकारे गौरवशाली भारताचे स्वप्न गांधीजींच्या विचारातूनच पूर्ण होणारे होते. या दृष्टिकोनातून त्यांच्या सामाजिक विचारसरणीवर प्रकाश टाकण्याच्या उद्देशाने प्रस्तुत शोधनिबंधाची दिशा ठरविण्यात आली आहे.

## शोधनिबंधाचे उद्देश

१. म. गांधीजींच्या भारताच्या विकासाबाबतच्या विचारसरणीचा अभ्यास करणे.

२. म. गांधीजींचे भारताच्या राष्ट्र निर्माणातील योगदान स्पष्ट करणे.

३. त्यांच्या विचारातून भारताच्या आदर्श राष्ट्र निर्मितीच्या दृष्टीने मांडलेल्या विचारांचा उहापोह करणे.

म.गांधीजींच्या भारताच्या आदर्श राष्ट्र निर्मितीच्या दृष्टीने मांडलेल्या विचारांचा उहापोह वैचारिक प्रयत्नांचा, विचारसरणीचा आढावा पुढीलप्रमाणे घेण्यात आला आहे.

**आदर्श राष्ट्र निर्माणासाठी आदर्श खेडे**

आदर्श राष्ट्र निर्मितीच्या उद्दिष्टपूर्तीसाठी मूलभूत समस्यांवर उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे मत महात्मा गांधीजींनी व्यक्त केले. त्यासाठी प्रत्येक व्यक्तीचा विकास घडवून आणणे आवश्यक आहे. व्यक्तीच्या विकासातूनच गावाचा विकास होईल, देशाचा विकास होईल. त्यांच्या या विचारातून समृद्ध, संपन्न ग्राम समाज तयार होईल तसेच हा विकास होताना पर्यावरण, आरोग्य, नैतिकमूल्य, मानवतावाद यांची जोपासना होईल. स्वातंत्र्य आंदोलनात प्रवेश करण्यापूर्वी महात्मा गांधीजींनी भारतभ्रमण करुन तत्कालीन खेड्यांचे प्रत्यक्ष अवलोकन करुन त्यांच्या समोरच्या अडचणी, समस्या जाणल्या होत्या. तसेच भारतात अनादी काळापासून खेड्यांची जी संपन्नता होती त्यांचाही अभ्यास केला होता. यातूनच गांधीजींनी ग्रामीण समाज जीवनासंबंधी आपले विचार मांडले आहेत. त्यांचे विचार म्हणजे ग्रामीण विकासाच्या मार्गात ज्या समस्या आहेत. त्या सोडविण्याचा अतिशय प्रभावी उपाय आहे. यातून मार्गक्रमण केल्यास निश्चितच आदर्श समाजनिर्मितीच्या प्रयत्नांना यश प्राप्त होईल. या दृष्टीकोनातून गांधीविचार अत्यंत प्रभावी असल्याचे स्पष्ट होते.

भारत हा खेड्यांचा देश आहे. आमची संस्कृती खेड्यांमधून उदयास आली आहे तसेच तिचे संवर्धन व जतनही खेड्यांतून केले गेले आहे. आजही भारतातील मोठी लोकसंख्या ग्रामीण भागातून निवास करते. अन्न, फळे-फुले, भाजीपाला, दूध, उद्योगांना लागणारा कच्चामाल हा ग्रामीण भागातून उपलब्ध होतो. भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी भारताची खरी समृद्धी ग्रामीण भागात अस्तित्वात होती. भारताचा स्वातंत्र्यानंतरचा विकास लक्षात घेता आजची भारताची ग्रामीण स्थिती अनेक उनिवा दिसू लागतात. शहरांच्या विकासासाठी खेड्यांची झालेली बकाल अवस्था ही भारताच्या समृद्धी तील एक मोठा अडथळा म्हणता येईल. वाढत्या शहरीकरणामुळे व शहरातील भौतिक सोयीसुविधांच्या अपेक्षेने ग्रामीण जनतेचे होणारे शहराकडील स्थलांतर यातून खेडी ओस पडली आहेत. येथील सुशिक्षित जनता ग्रामीण भागातून शहरी भागाकडे स्थायिक होण्याचा कल वाढतो आहे. त्यातून ग्रामीण भागात ग्रामीण भागाच्या विकासासाठी आवश्यक असणारी सुशिक्षित तरुण, प्रशिक्षित कामगार शहराकडे स्थायिक होत आहेत. ग्रामीण भागात वापरात असणाऱ्या सर्वच उपयोगी वस्तू शहरी भागांतून ग्रामीण भागात विक्रीस येतात त्यामुळे ग्रामीण भागातील आर्थिक संपत्तीचा ओघ शहरी भागाकडे एकवटू लागला आहे. शहरे अधिक समृद्ध होत आहेत तर खेडी दुःख, दारिद्र्य, उपासमार, बेरोजगारी, बलमजुरी, अशिक्षितता, अंधश्रद्धा, कुपोषण, यांसारख्या अनेक समस्यांमधून जात आहेत. या सर्वांवर गांधीजींनी सांगितलेल्या ग्रामस्वराज्य हा विचार खऱ्या अर्थाने भारताला समृद्ध बनवणारा एक मार्ग ठरतो.

**स्त्री पुरुष समानता –राष्ट्र निर्माणातील महत्वाचे पाऊल**

सध्याचे युग हे स्त्री-पुरुष समानतेचे युग आहे. अशा काळात स्त्रीयांना अपमानास्पद होणारी वागणूक अथवा भेदभाव करणे हे या काळाशी सुसंगत नाही. स्त्रीयांच्या हक्कांच्या बाबतीत गांधीजी कोणत्याही तडजोड करायला तयार नाहीत. पुरुषांवर नसलेले कोणतेही कायदेशीर बंधन स्त्रियांवरही नसावे. “अर्थात मुलगा जन्मला म्हणजे हर्षाने बेहोश व्हावे आणि मुलगी जन्मली म्हणजे दुःख करत बसावे याचे कारण गांधीजी म्हणतात की, माझ्या ध्यानात येत नाही स्त्री किंवा पुरुष दोघेही असले तरी ती ईश्वराची देणगी आहे. दोघांनाही जगण्याचा सारखाच हक्क आहे आणि जगाची रहाटी

चालू राहण्यासाठी किंवा ठेवण्यासाठी दोघांचीही सारखीच समान गरज आहे. " कारण स्त्री आणि पुरुष यांना वेगवेगळे अस्तित्त्व नाही. उलट एकाचेच ते दोन भाग आहेत. मुला इतकाच मुलीला ही वारसा हक्क मिळावा. तसेच तिची कमाई ही दोघांसाठी ही सामाईक जिंदगी आहे. याचे कारण हे आहे स्त्री जरी घरी गृहिणी म्हणून काम करत असेल तर ती पतीच्या अर्थजनात किंवा द्रव्याजनात मदत करत असेल तसेच दोघांच्याही वेतनामध्ये विषमता असू नये. हे वरील सर्व विचार गांधीजीचे होते.

**सत्य आणि अहिंसा यातून राष्ट्रबांधणी**

म. गांधींनी उभारणीच्या दृष्टीने आवश्यक असणाया सत्य आणि अहिंसा तत्त्वाची मांडणी केली. त्यांनी शाश्वत सत्यासोबतच अहिंसेच्या तत्त्वांचे पालन करण्याचा संदेश दिला. त्यांच्या मते अहिंसा या तत्त्वाच्या पालनाशिवाय कोणत्याही व्यक्तीकडून स्वहिताची अंमलात आणली जाऊ शकत नाही. अहिंसेशिवाय कोणताही समाज आदर्श समाज बनू शकत नाही. तसेच कोणत्याही समाजाची पुनर्बांधणी केली जाऊ शकत नाही. व्यक्तींच्या समूहाला समाज म्हटले जाते. व्यक्ती समूहाकडून अहिंसेचे पालन होणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

**सर्वांगीण विकासातून राष्ट्रनिर्मिती**

म. गांधींना ग्रामीण भारतातील गरिबी, दारिद्र्य, बेकारी सारख्या गहन प्रश्नांची जाण होती. म्हणूनच त्यातून मार्ग काढण्याच्या उद्देशाने त्यांनी स्वदेशीचा पुरस्कार केला. ग्रामस्वराज्याच्या माध्यमातून ग्रामीण समाजास आदर्श बनविण्यावर भर दिला. ग्रामीण भागातील लोकांमध्ये जाती-धर्म भेदभाव विरहित समाजव्यवस्था रुजविण्याच्या दृष्टीने त्यांनी विचार व्यक्त केले. त्यांच्या मते ग्रामीण भागातील कृषीक्षेत्रात सुधारणा करुन, विकेंद्रिकरणाच्या माध्यमातून, गरीब-श्रीमंतामधील दरी कमी करुन ग्रामस्वराज्य निर्माण केले जाऊ शकते. त्यांच्या मते खेड्यातील लोकांना खेड्यातच आपली उत्पादने विक्री करता आली तर त्यांना शहरात स्थलांतर करण्याची वेळ येणार नाही. यातून आत्मनिर्भरता आणि स्वयंपूर्णता निर्माण होईल. जी राष्ट्रबांधणीच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त अशा स्वरुपाची ठरु शकते.

**सामाजिक ऐक्य, समतेच्या माध्यमातून राष्ट्र निर्माण**

म. गांधींना सामाजिक ऐक्य, समता प्रस्थापित करावयाची होती. यादृष्टीने त्यांनी विषमतेवर आधारित समाजव्यवस्थेचा विरोध केला. समाजातील कोणत्याही प्रकारचा भेदभाव त्यांना मान्य नव्हता. अस्पृश्यतेबाबत विचार व्यक्त करतांना गांधीजींनी अस्पृश्यता ही समाजाला लागलेला कलंक आहे असे मत व्यक्त केले. सर्वांचा आत्मा हा सारखा आहे. सर्वांचा ईश्वर एक आहे. मग ही अस्पृश्यता कसली. सर्व लोक हे एकाच ईश्वराची लेकरे आहेत. ते म्हणत की, मला पुनर्जन्माची इच्छा नाही. परंतु मला जर पुनर्जन्म मिळाला तर मी अस्पृश्य कुटुंबात जन्म घेऊ इच्छितो. गांधींजीच्या मते अस्पृश्य त्याला म्हणावे जो खोटे बोलतो, जो ढोंगी आहे. त्यामुळे ग्रामीण विकासात अस्पृश्यता हा मोठा अडसर आहे व तो दूर झाला पाहिजे.

**औद्योगिक विकासातून राष्ट्रनिर्मिती**

गाधीजींनी ग्रामोद्योगाचा पुरस्कार केला. ग्रामोद्योगामुळे खेड्यातून स्वयंपूर्णता येईल तसेच त्यातूनच रोजगाराच्या संधी निर्माण होतील. ग्रामीण युवकांना तेथेच काम मिळेल. याबाबत गांधीजी म्हणत. ग्रामोद्योगांच्या योजनेमागील माझी कल्पना ही आहे की, आम्ही आपल्या दैनंदिन गरजा खेड्यांतून निर्माण होऊ शकणाऱ्या जिन्नसांद्वारेच भागवाव्या. जे गावातून मिळत नसेल ते थोडे परिश्रम आणि संघटन करुन किफायतीने उत्पन्न करता येईल की नाही याची तपासणी करावी आणि किफायतीचाही विचार व्यक्तिगत नसावा. पूर्ण गावाच्या कल्याणाचा तो असावा. याद्वारे गावांचे

आर्थिक हित साधले जाईल. गावे आर्थिक दृष्टीने भरभराटीस पोहचतील. पाश्चिमात्य राष्ट्रे औद्योगिकीकरणाच्या माध्यमातून विकासाकडे अग्रेसर झाली. परंतु भारताची परिस्थिती निराळी आहे. येथील परिस्थितीनुसार गाधीजींनी हस्तकला व्यवसाय, कुटिरोद्योग, ग्रामोद्योगांना महत्त्व दिले ग्रामीण विकासाच्या माध्यमातून अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी त्यांनी ग्रामोद्योगाला प्राधान्य दिले. ग्रामोद्योग हाच ग्रामीण जीवनाला विकसित करणारा महत्त्वपूर्ण पर्याय आहे. ग्रामीण स्तरावरुन ग्रामीण उद्योगाची सुरुवात करावी वस्तुंचे उत्पादन करावे. शहरातून त्या वस्तुंची विक्री केंद्रे काढावी. परकीय मालावर बहिष्कार टाकावा. त्यामुळे परराष्ट्रात जाणारी संपत्ती देशातच राहून ग्रामीण अर्थव्यवस्था स्थिर व स्वयंपूर्ण होईल असे त्यांचे ठाम मत होते. समारोप - म. गांधी यांनी राष्ट्राच्या स्वातंत्र्यासोबतच राष्ट्रनिर्मितीसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या विचारातूनच भारताची जडणघडण झाली असून त्यांनी दाखविलेल्या मार्गावरच वाटचाल चालू आहे. भारतातील परिस्थिती ओळखून गांधीजी आधुनिक महाउद्योगाला आणि यांत्रिकीकरणाला महत्त्व देत नाहीत. स्वयंपूर्ण खेडे हाच गांधीजींचा अर्थकारणाचा आणि राजकारणाचा लक्ष्यबिंदू आहे. त्यासाठी गांधी कुटीरोद्योग आणि लघु उद्योगांना प्राधान्य देतात. कारण यामुळे बेकारी दूर होते. आर्थिक विकास होतो व परकीय मदतीवर अवलंबून राहण्याची गरज राहत नाही. खेड्यांचा विकास म्हणजे पर्यायाने भारताचा विकास होय. त्यातूनच भारतासारख्या राष्ट्राची उभारणी योग्यरीतीने होत असल्याचे दिसून येते.

**व्यसनमुक्तीची दिशा - आदर्श राष्ट्र आणि समाज निर्मिती**

महात्मा गांधीजींनी व्यसनाधीनतेस मानवाचा सर्वात मोठा शत्रू मानले. ज्यामुळे मानवाची आर्थिक, मानसिक आणि शारीरिक हानी होते. व्यसनाधिनतेमुळे आदर्श समाज निर्माण होण्यात मोठा अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे गांधीजींनी व्यसनमुक्तीचा संदेश दिला. गांधीजी म्हणतात, कोणत्याही प्रकारचे व्यसन हे समाजाला कमकुवत करते. म्हणून प्रत्येक गावात नशाबंदी झाली पाहिजे. मद्य, तंबाखू व गुटखा यापासून ग्रामीण जनतेने दूर राहिले पाहिजे. विविध प्रकारच्या मदाक द्रव्यामुळे मानवामध्ये क्रूर विचार निर्माण होतात. समाज अधोगतीकडे जातो. म. गांधींनी दारुबंदीसाठी प्रयत्न केले. मद्यामुळे व्यसनाधीनता वाढत आहे व यातून ग्रामीण विकासाला खीळ बसली आहे. अनेक कुटुंबे उध्वस्त झाली आहेत. म्हणून दारुबंदी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मद्यपानामुळे नैतिकतेचे पतन होते. आज मद्यपानामुळे अनेक कुटुंबे उध्वस्त झाली आहेत. अनेक मजूर शेतकरी आपले उत्पन्न मद्यपानात घालवत आहेत. याचा अशाप्रकारे ग्रामीण समाजावर विपरित परिणाम होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

**समारोप**

म. गांधी हे भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात अग्रभागी असलेले महत्त्वाचे व्यक्तिमत्व होय. गांधीजींनी केवळ राष्ट्र स्वातंत्र्याचाच विचार केला नाही तर भारताच्या राष्ट्र निर्मितीच्या दृष्टीने महत्वपूर्ण योगदान दिले आहे. हा भारत देश समृद्ध कसा होईल याचाही विचार केला, म्हणून जनता त्यांना 'महात्मा', 'राष्ट्रपिता' अशा नावांनी ओळखते. गांधीजींनी आपल्या विचारातून स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता या गुणांनी संपन्न असलेला स्वयंपूर्ण भारत निर्माण करण्यासाठी ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम असली पाहिजे असे मत व्यक्त केले. भारताला स्वातंत्र्याबरोबर स्वयंपूर्णता मिळवायची असेल तर खेडी स्वयंपूर्ण बनली पाहिजे भारतातील हा विचार गांधीजींनी मांडला. खेड्यांनी सर्वच बाबतीत स्वयंपूर्ण झाल्याशिवाय खेड्यात आर्थिक सुबत्ता येऊ शकणार नाही असे मत गांधीजींची होते. ज्याप्रमाणे कृतीद्वारे शिक्षण व शिक्षणाद्वारे लोकशाहीची प्रतिष्ठापना हा शिक्षणाचा मार्ग गांधीजींनी स्विकारला होता. शिक्षणाशिवाय देशाला तरणोपाय नाही अशी त्यांची धारणा होती. प्रत्येक व्यक्तीला सुसंस्कृत व चारित्र्यसंपन्न बनविण्याचा अत्यंत सोपा मार्ग म्हणजे शिक्षण होय. तसेच माणसाला 'माणुस' बनविणारे त्याला उद्योग देणारे शिक्षण हे साध्य नसून साधन आहे. आर्थिक

शोषण, पारतंत्र्य, गुलामगिरी, दारिद्र्य इ. चे ज्ञान लोकांना करुन द्यायचे असेल तर शिक्षणशिवाय दुसरे माध्यम नाही. त्यावरच सक्षम राष्ट्राची उभारणी केली जावू शकते असे त्यांचे ठाम मत होते.

**संदर्भ ग्रंथ सूची**


१. Gandhian Vision of Rural Development, Shusha Deshmukh, International Referred Research Journal-2012

२. Gandhian approach to rural Development Yesu suresh Ras. & muthupandi P.National journal of multidisciplinary Research and Development Vol. Issue-3 July 2016

३. Gandhi and Economic Development (Ed) B.P. Panday., Radinat publishers, New Delhi. 1991 Rural Development planning and reforms,. Shah S.M., Abhinav Publication New Delhi. 1977.

४. म. गांधी -माझ्या स्वप्नातील भारत

५. डॉ. हरिशकुमार - गांधी (सामाजिक, राजनैतिक परिवर्तन)

६. महात्मा गांधी- ग्रामस्वराज्य

७. लोकराज्य- ऑक्टो. 2020

८. दै. लोकसत्ता- २ ऑक्टो. 2021